83 YEARS OF UNTIRING SERVICE

Rotary | CREATE LASTING IMPACT | TEAM PHOENIX

# ROTARY CLUB OF KOLHAPUR

**RI District 3170** | Club No. : **15655** | Charter No. : **5685** | Charter Date. : **01-11-1943**

# ROTARY HERALD

**WEEKLY BULLETIN** **2026-27**

**DATE : 26 August 2026**


## AUGUST : MEMBERSHIP & NEW CLUB DEVELOPMENT

### weekly Meeting : 19th August




आपली १९ ऑगस्ट ची साप्ताहिक मिटिंग ही अतिशय इंटरेस्टिंग होती. श्रावण भोजना सोबत हाऊजी गेम देखील अरेंज केले होते . त्यामुळे ऑफिशियल मीटिंग थोड्या वेळात संपवून रोटरी ऍन तर्फे हाऊजीचे आयोजन करण्यात आले. एकूण दोन राऊंड झाले. सर्वांनी गेम्स खूप एन्जॉय केले मीटिंग हॉल फुल होता. त्यानंतर सर्वांनी कुटुंबीयांसह स्वादिष्ट श्रावण भोजनाचा आस्वाद घेतला. पुरणपोळी, मोदक, मसालेभात यासह खास महाराष्ट्रीयन बेत केळीच्या पानावर सर्वांनी एन्जॉय केला. अशा तऱ्हेने मीटिंग अत्यंत आनंदात संपन्न झाली!

**मिटींगसाठी उपस्थित क्लब मेंबर्स व कुटुंबीय**



******

Driving **Innovation** and **Growth** for **Better Future**


**RTN. DR. LENNY DA COSTA**
DISTRICT GOVERNOR 2026-27

**RTN. OLAYINKA BABALOLA**
R I PRESIDENT 2026-27

**RTN. HARSHAD DHALE**
CLUB SECRETARY 2026-27
rtn.harshad3170@gmail.com

**RTN. PRADEEP PASMAL**
CLUB PRESIDENT 2026-27
rtn.pradeep3170@gmail.com

**RTN. NILESH KUTTE**
JT. BULLETIN EDITOR
nilesh.kutte@gmail.com

**RTN. SANJEEV CHIPLUNKAR**
BULLETIN EDITOR
kalakalpana.advt@gmail.com



**Bulletin Issue No: 08**



0231-2651444
www.rotarykolhapur.org
Instagram : rotarykolhapur

# श्रावणभोज/हौजी गेम्स






## Project Report: Uniform Distribution to Needy Students





Rotary Club of Kolhapur successfully conducted its annual Uniform Distribution Project on 22 August 2026 at V. S. Khandekar Prashala, Shahupuri, Kolhapur.Uniforms were distributed to needy students to support their education, boost confidence and promote equality.Members Present:IPP Rtn. Pradeep Karande, Rtn. Subhash Malu, Rtn. Mohan Patel, Rtn. Arvind Taral, Rtn. Netaji Kankekar & Rtn. Amol Ghodake.Thank you to all members for your valuable time and support.Regards, Rotary Club of Kolhapur Team 2026-27

# मेंबर सविस्तर! शुभेच्छा निरंतर ..



**रो.अमोल घोडके**

त्याचे मूळ गाव व जॉइंट फॅमिली कोल्हापूरचीच असली तरी रो. अमोलचा जन्म व मेकॅनिकल इंजिनिअरिंगचे शिक्षण त्याने काकांकडे बेळगावला राहून पूर्ण केले. त्यांचा मूळ व्यवसाय खाद्यतेल व कॅटल फिडचा असून तो कोल्हापूर सांगली हुबळी येथे विस्तारलेला आहे. वयाच्या २३ व्या वर्षी १९९८-९९ मध्ये तो फॅमिली व्यवसायात रुजू झाला. सुरुवातीला पुण्यात दोन-तीन वर्षे काम केले व नंतर इचलकरंजी येथे तीन ते चार वर्षे पार्टनरशिप मध्ये हायड्रोलिक पॉवर पॅक कंपोनंट मॅन्युफॅक्चरिंग चा व्यवसाय केला. पॉलिहाइड्रॉन या बेळगावच्या कंपनीचे पंप, पाईप फिटिंग ची डिस्ट्रीब्यूटरशिपही त्यांच्याकडे आहे. पुढे २००६ मध्ये हायड्रोलिक कंपोनंट मॅन्युफॅक्चरिंग साठी त्याने मे. इन्फिनिटी सोर्स नावाची स्वतःची फॅक्टरी शिरोली येथे सुरू केली.

२००५ मध्ये त्याचे लग्न झाले. पत्नी राखी हाऊस मेकर असून दोन मुलींपैकी साची अहमदाबाद मध्ये प्रॉडक्ट डिझाईन विषयात बॅचलर करते आहे, तर त्रिशा संजय घोडावत स्कूल मध्ये अकरावीत शिकते आहे.

रो गिरीश जोशी प्रेसिडेंट असताना त्यांनीच अमोलला रोटरी मध्ये आणलं ते २०१९ मध्ये. याच दरम्यान पूर परिस्थितीमुळे जनतेच्या सेवेसाठी काम करण्याची संधीही त्याला मिळाली व त्यातून खूप चांगले मित्र व मोठे सोशल सर्कल देखील रोटरी मुळे मिळाले असे तो आवर्जून नमूद करतो. त्याने आतापर्यंत आपल्या क्लब मध्ये कम्युनिटी सर्विस, क्लब सर्विस व व्होकेशनल सर्विस या डायरेक्टरशिप पूर्ण केल्या असून लॅडर नुसार रोटरी मध्ये पुढे जाण्याचे त्याचे स्वप्न आहे. तो क्लब मध्ये अतिशय ॲक्टिव्ह आहे. २५ ऑगस्ट ला येत असलेल्या त्याच्या वाढदिवसानिमित्त व रोटरी आणि बिझनेस च्या उत्तम करिअरसाठी त्याला रोटरी हेरॉल्ड च्या हार्दिक शुभेच्छा!

खाद्यतेल व कॅटल फीडपासून हायड्रॉलिक पर्यंत  
बिझनेस सोबत समाजसेवेसाठी रोटरी पर्यंत  
प्राची- त्रिशा बरोबर राखी सोबत रो.अमोल  
रोटरी शुभेच्छांसह करिअर व्हावे अनमोल

---

# भारतभ्रमण

## राजस्थान

बिकानेर हे भारताच्या राजस्थान राज्यातील थार वाळवंतातील एक प्रसिद्ध ऐतिहासिक शहर आहे. जयपूरपासून वायव्येस सुमारे ३३० किलोमीटर अंतरावर वसलेल्या या शहराची स्थापना १४८८ मध्ये राव बिका राठोड यांनी केली. हे शहर सुंदर किल्ले, वाळवंट आणि उंटांसाठी जगभर ओळखले जाते.

बिकानेरची महत्त्वाची माहिती- स्थापना: १४८८ मध्ये राव बिकाजी द्वारे.

टोपणनाव: उंटांचा देश (Camel Country). मुख्य आकर्षणे:

**जुनागड किल्ला**: लाल दगडात बांधलेला, सुंदर नक्षीकाम आणि ऐतिहासिक वास्तू




असलेला प्रसिद्ध किल्ला.

**करणी माता मंदिर (देशनोक)**: उंदरांचे मंदिर म्हणून जगप्रसिद्ध असलेले पवित्र धार्मिक ठिकाण.

**लालगड पॅलेस**: सुंदर राजवाडा आणि संग्रहालय. संस्कृती व प्रसिद्ध वास्तू: राजस्थानी हस्तकला, लेदर क्राफ्ट आणि बिकानेरी नमकीन (भुजिया) व मिठाई. दरवर्षी जानेवारी महिन्यात होणारा प्रसिद्ध उंट महोत्सव (Camel Festival).



## HAPPY BIRTHDAY

| | |
|---|---|
| Rtn. Amol Ghodke | 25 Aug. |
| Rtn. Prasad Dabeer | 28 Aug. |

## Next Meeting :

विषय:

**Club Business Meeting (Close Meeting)**


स्थळ: माधवप्रसाद गोएंका भवन, रोटरी समाजसेवा केंद्र

दि.२६ ऑगस्ट २०२६

सायं.५.३० वा.

## बी+ve

ज़ीवन आहे खरी कसोटी,
मागे वळून पाहू नका;
येईल तारावया कोणी,
वाट कोणाची पाहू नका.
हे सारं जग जिंकायचं आहे,
हार कधी मानू नका;
यश तुमच्याजवळ आहे,
जिंकल्याशिवाय थांबू नका.





## आपण यांना ओळखलेत का?



आपल्या क्लबचे ॲक्टीव्ह मेंबर
ओळखलंत तर फोन करा सत्वर.
फोन **9822421262**
बरोबर सभासदांची नांवे आम्ही
पुढील बुलेटीनमध्ये प्रसिध्द करू.
त्याबरोबर इतरांना त्यांची ओळखही करून देऊ.

### रोटरी क्लब ऑफ कोल्हापूरचे ज्येष्ठ सभासद रो.नारायण पटेल



**आपण यांना बरोबर ओळखलेत....**

रो.कुशल राठोड
रो.प्रताप पुराणिक
रो.उपेंद्र देऊसकर
रो.अजिंक्य कदम



## THE 4-WAY TEST:

**Of the things we think, say or do,**
Is it the **Truth**? Is it **FAIR** to all concerned?
Will it build **GOODWILL** & **BETTER FRIENDSHIPS**?
Will it be **BENEFICIAL** to all concerned?

We meet every **WEDNESDAY 5:30PM** at
**ROTARY SAMAJ SEVA KENDRA**
Madhavprasad Goenka Bhavan, Collector Office Road,
Nagala Park, Kolhapur 416 003